# प्रकरण दुसरे

## पंचायती राज्य कार्य पध्दती

# प्रकरण दुसरे

## पंचायती राज्य कार्य पध्दती

१ मे, १९६२ रोजी पासून महाराष्ट्रामध्ये १९६१ सालच्या महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती कायद्याच्या कलम २९० अन्वये लोकशाही विकेंद्रीकरणाचे नवीन पर्व सुरु झाले. यामध्ये सर्वात वर राज्यसरकार आणि सर्वात खाली ग्रामपंचायती यांच्या दरम्यान लोकशाही स्वरूपाच्या संस्था स्थापन केल्या गेल्या. सरकारकडील विकासात्मक आणि प्रशासनात्मक कामे घटनात्मक निर्बंध पाळून करावी लागतात. मोठया जबाबदाऱ्या पार पाडण्याकरिता स्थानिक नेतृत्व निर्माण करणे त्यासाठी लोकशिक्षण उपलब्ध अशा साधनसामुग्री लक्षात घेवून लोकांच्या गरजा भागवणेसाठी जास्तीत जास्त कार्यक्षमतेने लोकांची सेवा करणे, आवश्यक कार्याला प्राधान्य देणे इत्यादि हेतु विकेंद्रीकरणामागे आहेत.

राज्य सरकारने आपल्यावरील स्थानिक कार्याची जबाबदारी कमी केली व ती लोकांवर सोपविली आहे. त्यामुळे राज्य सकरकारला विकासाच्या मोठया योजनांवर आपले लक्ष केंद्रीत करता येईल. या कायद्यान्वये अंमलात येणाऱ्या स्थानिक प्रशासकीय यंत्रणेमुळे उपलब्ध साधनसामुग्रीतून जनतेचा जास्तीत जास्त फायदा करून देता येईल.

रचना : उपरोक्त कायद्यातील रचनेच्यासंबंधी असलेल्या तरतुदीन्वये प्रत्येक जिल्हयासाठी एक जिल्हा परिषद असावी. तीसाठी एक अध्यक्ष आणि ४० ते ६० सभासद यांचा जिल्हा परिषदेत समावेश असावा. स्थायी

समिती तसेच प्रत्येक विषयाच्या विषयवार समित्या पंचायत समित्या, अध्यक्ष, मुख्य प्रशासन अधिकारी, गट विकास अधिकारी व इतर अधिकारी यांचा एकंदर कारभारयंत्रणेत समावेश होतो. जिल्हा परिषदेला निरनिराळ्या विभागांचे सहाय्य मिळेल व या सर्व विभागांचे प्रशासकीय प्रमुख म्हणून राज्य सरकारच्या नोकरीत असलेल्या वर्ग १ व २ च्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यांत येईल.

जिल्हा परिषदेचे सदस्य निवडून आलेले असतील. तसेच जिल्हा परिषदेच्या सदस्यांची संख्या ४० पेक्षा कमी अथवा ६० पेक्षा जास्त असणार नाही. साधारणत: ३३,००० लोकसंख्येच्या टापूतून एक सदस्य निवडून येईल. निवडून आलेल्या सदस्यांमध्ये एकहि महिला नसेल तर एक महिला स्वीकृत सदस्य म्हणून परिषदेवर घेण्यात येईल. पदसिध्द अधिकारी (एक्स ऑफिशिओ) व पंचायत समित्यांचे अध्यक्ष यांचाही समित्यांमध्यें समावेश राहील. जिल्हा पातळीवरील पांच संयुक्त सहकारी संस्थांचे अध्यक्ष यांचा संलग्न सभासद म्हणून समावेश करण्यांत येईल. शक्यतो जिल्ह्यांमधील - १) कर्ज, २) जमीन विकास, ३) खरेदी-विक्री, ४) औद्योगिक सहकारी संस्था व ५) सहकारी प्रशिक्षण व शिक्षण यासंबंधीचे व्यवसाय व कामें करणाऱ्या संयुक्त सहकारी संस्थांचे अध्यक्ष हे संलग्न सदस्य म्हणून समाविष्ट करुन घेण्यांत येतील. हे सदस्य साधारणत: पांच वर्षांपर्यंत आपल्या पदांवर राहतील. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड सदस्यांकडून होईल. अध्यक्षांना दरमहा ५००/- रुपये मानधन मिळेल व त्यांना राहण्यासाठी घराची व्यवस्था करण्यांत येईल.

प्रत्येक विकास गटाला एक पंचायत समिती राहिल व तीत गटविभागातून निवडून आलेले आणि त्याच भागांतील स्वीकृत केलेले सदस्य असतील.

तसेच कृषि उत्पादनाच्या खरेदी व विक्री करणाऱ्या एक सहकारी संस्थेचे अध्यक्ष यांचा संलग्न सदस्य म्हणून तीत समावेश राहील आणि कृषि व्यवसाय करणाऱ्या एका सहकारी संस्थेचे अध्यक्ष हे स्वीकृत सदस्य राहतील. समितीमध्ये एखाद्या महिलेचा समावेश नसल्यास संबंधित गटात राहणाऱ्या एका महिलेला स्वीकृत सभासद म्हणून समितीत घ्यावे लागेल. जेथे सरकार तसा आदेश देईल तेथे वर्गीकृत जातीचा सभासद निवडून आला नसेल तर त्या जातीचा एक सभासद समितीला स्वीकृत करून घ्यावा लागेल. परिषदेच्या प्रत्येक मतदार विभागांतून दोन सरपंच या हिशोबांप्रमाणे सरपंचांचाही समितीत समावेश राहील. हे सरपंच पंचायतीच्या सदस्यांकडून निवडलेले असतील. प्रत्येक सरपंच सदस्यांच्या निवडणूकीकरितां वेगवेगळे मतदारसंघ राहतील. समितीत निवडून आलेले सदस्य पंचायत समितीचा अध्यक्ष निवडतील.

प्रत्येक जिल्हा परिषदेमध्यें अर्थ समिती, बांधकाम समिती, शेतकी समिती, सहकार समिती, शिक्षण समिती व आरोग्य समिती या समित्या राहतील. जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीमध्यें जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, विषय समितीचे अध्यक्ष, परिषदेने निवडलेले सात सदस्य राहतील व त्या-शिवाय कामाचा अनुभव असलेले दोन संलग्न सदस्य (यांची संख्या दोन पेक्षा जास्त राहणार नाही) स्थायी समितीत घेण्यात येतील. उपमुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हा परिषदेचे व स्थायी समितीचे पदसिध्द सेक्रेटरी (एक्स ऑफिशिओ) राहतील. विषय समितीच्या सभापतींना दरमहा ३००/- रुपये मानधन मिळेल व त्यांच्यासाठी राहण्यासाठी घराची व्यवस्था राहील. एक मुख्य कार्यकारी अधिकारी व एक उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची सरकार नियुक्ती करील. जिल्हा परिषदेतील सदस्यांनी दोन तृतीयांश

बहुमताने मुख्य कार्यकारी अधिका-याविरुद्ध ठराव मंजूर केल्यास सरकारला त्या अधिका-याला परत बोलावून घ्यावे लागेल. प्रत्येक पंचायत समिती-करिता सरकार एका गटविकास अधिका-याची नियुक्ती करील. कायद्याच्या तरतुदीप्रमाणे कामे करण्यासाठी शासकीय अधिका-यांना मुख्य कार्यकारी अधिका-यांचा व गटविकास अधिका-यांचा हुकूम मानावा लागेल.

ग्रामपंचायत कायदा - १९५८ :

ग्रामपंचायत ग्रामीण भागाच्या दृष्टीने लोकशाही युगात फार प्रगत पाऊल आहे. स्वराज्य आणि लोकशाही अधिष्टित राज्य यांची प्राथमिक शाळा म्हणजे ग्रामपंचायत होय. ग्रामीण जनतेच्या दृष्टीने त्यांना जागरूक करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे ग्रामपंचायत होय.

ग्रामपंचायती पूर्वापार पासून आहेत. परंतु त्यांच्या स्वरूपात आणि कार्यक्षेत्रात मूलभूत आणि नजरेत भरतील असे बदल करण्यात आले आहेत. ग्रामपंचायती आपला कारभार चोखपणे बजावू शकतील आणि नागरिकांना स्वातंत्र्यात महत्त्वाचे स्थान देवू शकतील असा कायद्याचा हेतू आहे.

१९७२ पासून या कायद्यात सुधारणा घडवून आणलेल्या आहेत. १९७२ व ७३ या २ वर्षात ग्रामपंचायतीच्या कायद्यात भरीव सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. १९७३ च्या कायद्याने त्यांची मुदत पांच वर्षांची केली आहे. सरासरी जमिन महसुलीची सर्व रक्कम देण्याची योजना आखली आहे. ७२-७३ या सालात ग्रामसेवा योजना व्हीलेज एलूपमेंट फंडाची

तरतूद शासनाने करून दिली व पंचायतींना मोठया प्रमाणात पैसा उपलब्ध करून दिला. ग्रामपंचायतीचे अधिनियम तयार करण्यात आलेले आहेत. गावाची लोकसंख्या अगदी नजिकच्या जनगणनेची आकडेवारी घेवून करण्यात आली. लोकसंख्येचे आकडे १०-१० वर्षांनी कळून येतात. त्याप्रमाणात जमिन महसूल अनुदान वापरतात.

पुढे १९७५ साली कांही मुख्य सुधारणा करण्यात आल्या. ५००/- रूपयाच्या आतील उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण गटविकास अधिकारी करतील आणि कांही गैरप्रकार आढळले तर त्यांच्या-वर नियंत्रण घातले जाईल. आता जिल्हा परिषदेच्या मुख्य अधिका-याकडे लेखा परीक्षेचा अहवाल पाठविला जातो व मुख्य कार्यकारी अधिकारी त्याबद्दलचे नियंत्रण करतात. आता जमिन महसूलाची वसूल ग्रामपंचायतीवर सोपविण्याचा प्रश्न उरत नाही. कारण त्यांच्या कक्षेतून तो प्रश्न काढला आहे. दिवाबत्ती, साफसफाई, बांधकामावर नियंत्रण, स्थानिक विकास याबाबत शासन ग्रामपंचायतीकडे आहे. रोजगार हमीमूळे ग्रामीण जनतेचे आर्थिक प्रश्न सुटतील.

पंचायतीचा सदस्य होण्यासाठी त्याने देय-कराचो बाकी बील आल्यापासून तीन महिन्यात भरली पाहिजे. कराच्या बाबतीत तो नागरीक थकबाकीदार नसावा.जो पोलीस पाटील म्हणून पदाधिकारी असेल त्याला पंचायतीचा सदस्य होता येणार नाही. त्याचबरोबर लोकप्रतिनिधी कायद्या-न्वये जो अपराधी असेल आणि निवडणूक आयुक्तांनी त्याला अपात्र ठरविले असेल व त्याच्या अपात्रतेची मुदत कमी केली नसेल तर त्यास पंचायतीचा सदस्य होता येत नाही.

ग्रामपंचायतीने अंदाजपत्रक मुदतीत पाठवले पाहिजे. आता कर आकारणी ऐच्छिक नसून गांवातील जमिनीवर बांधलेली घरें, गावठाणात बांधलेली घरे यावर घरपट्टी आकारली जाते व ती भरण्याची सक्ती केलेली आहे. जमिनीत सुधारणा करण्याचा कर सक्तीने भरला पाहिजे. पंचायतीने आपल्या भागातील वाडयामधील लोकसंख्येच्या प्रमाणात त्या त्या वाडयावर खर्च करावा.

पाणीपुरवठा केल्यावर तो ग्रामपंचायतीने ताब्यात घ्यावा. नाहीतर जिल्हा परिषद त्याचा ताबा घेवून पाणीपुरवठयावर कराची आकारणी करेल. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायद्यातही त्याबाबतीत सुधारणा केलेल्या आहेत. १९४१ च्या कायद्याने नळयोजना हाती घेण्याचे टाळले तर जिल्हा परिषद ते काम हाती घेईल.

भारतीय घटनेने लोकशाही निधर्मी व समाजवादी समाजरचनेचा पाया घालून स्वातंत्र्याचे भवितव्य ठरविले व स्थानिक स्वराज्यात ग्रामीण विकासाचा घटक म्हणून ग्रामपंचायतींची उभारणी केली. ग्रामपंचायतीला तसे अधिकार व त्याप्रमाणे कामें देखील दिली आहेत. ते सर्व एकत्र करून व पाहिजे त्या दुरूस्त्या करून व जादा मजकूर ग्रामपंचायतीचा कायदा करण्यात आला. पूर्वी १९३३ पासून ग्रामपंचायत कायदा करण्यात आला होता. परंतु बदलत्या परिस्थितीप्रमाणे दुरूस्त्या करून नविन कायदा करण्यात आला आहे. या कायद्याचा उद्देश म्हणजे ग्रामीण विकास आणि सुधारणांचे अर्थ व मर्म ग्रामीण जनतेपर्यंत पोचवावे आणि भारताचा सर्वांगिण विकास करावा व प्रगत राष्ट्रात भारताचे प्रमुख स्थान असावे.

राज्यसरकार शासकीय परिपत्रकात अधिसूचित करील त्या तारखेपासून हा कायदा अंमलात येईल. याबाबत नगरपालिका, महा-नगरपालिका, सरकारी सैन्य, छावणीचा प्रदेश सोडून ज्या भागात ग्रामपंचायती आहेत त्यांनी १.६.१९५९ पासून हा कायदा लागू करावा असे जाहिर झालेले आहे. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा कायदा १९३० अन्वये शासकीय अनुदानासहित ज्या ग्रामपंचायतीचे उत्पन्न वार्षिक रु.५,०००/- पेक्षा कमी असेल तर ऑडिटरकडून ऑडिट करुन घ्यावे. जास्त उत्पन्न असल्यास उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ राहावा व कारभार सुरळीत चालावा म्हणून हिशोब तपासणी आवश्य आहे.

राहण्याची जागा ग्रामीण भागात झोपडी, धाबा, कॉंक्रीट ची असू शकते. त्याच्या बांधकामाची परवानगी पंचायत देत असते. तसेच मोकाट जनावरांसाठी कोंडवाडयाची योजना सुध्दा पंचायतीला करावी लागते. १० पेक्षा अधिक कामगार काम करत असतील तर अशा कार-खान्यांची परवानगी कारखाने निरीक्षकांकडून परवाना घेतला गेला पाहिजे.

गांवामधील १८ वर्षावरील वयाचे प्रौढ स्त्री पुरुष यांना मतदानाचा अधिकार दिला गेलेला आहे. तो पूर्वी २१ वर्षे पूर्ण असा होता. विधान-सभेची मतदार यादी पंचायत निवडणूकीसाठी ग्राहय धरली जाते. ग्रामाचा कारभार क्वचित प्रसंगी पंचायत प्रशासकामार्फतही चालविला जातो. पूर्व जनगणनेच्यावेळी निश्चित केलेली लोकसंख्या गांवची लोकसंख्या मानतात. निवडणूकीत निवडून आलेल्या सभासदांनी आपल्यामधून सरपंच व उपसरपंच निवडून द्यावा. त्यास पंगुत्व आले, मरण पावला, राजिनामा दिला,

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR LIBRARY
BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

त्यास कायदेशिर जिल्हाधिकाऱ्याने अपात्र ठरविले तर रिकाम्या जागेवर दुसऱ्या सदस्यांतून सरपंच, उपसरपंच निवडावा लागतो. पंचायतीची मुदत ५ वर्षे असेल. राज्य सरकार ती १ वर्षे वाढवून शकते. कलम १० अन्वये जे क्षेत्र विभागून देतात त्याला प्रभाग किंवा वॉर्ड म्हणतात. एका पंचायतीसाठी किंवा गटासाठी एक चिटणीस कलम ६० अन्वये राज्यसरकार नेमते व त त्याची सेवा मात्र जिल्हा परिषदेकडे दाखविली जाते.

नेहमी किंवा तात्पुरती जाण्यायेण्याची मोकळीक ज्यावर असते अशी सडक, पायवाट, चौक, आवार, बोळ किंवा मार्ग त्यावर रहदारी असो अगर नसो त्यांना रस्ते म्हणतात.

कायद्याने कर, उपकर, पट्टी किंवा आयातकर यांमध्ये कर बसविता येतो. त्यात फी येत नाही. फी कांही सेवेसाठी आकारली जाते. विशिष्ट सेवेसाठी कर आकारला जात नाही.

स्थायी समिती, पंचायत समिती, मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी हे शब्दप्रयोग जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम १९६१ मध्ये स्पष्ट केलेल्या आहेत. गटविकास अधिकारी या हुद्दयावर ठरविलेले काम करतो. मुख्य कार्यकारी अधिकारी हा जिल्हा परिषदेचे काम करतो. पंचायत समिती प्रत्येक गटासाठी रचण्यात येते.

भारतीय राज्यघटना अटी ३४१ अन्वये ज्या जाती वंश, जमाती आणि त्यांचे भाग, गट असेल त्यांचा अनुसूचित जातीत समावेश होतो. राष्ट्रपती राज्यपालांशी विचारविनिमय करून ज्या अनुसूचित जमातील

ठरवतो. महाराष्ट्रामध्यें त्या पुढीलप्रमाणे होत - अगार, अपोडी, वाकड, भांबी, भंगी, चक्र, वाधदासर, चलवादी, सांबार, चांभार, धेड, ढोर, मोचीयार, मोची, महार, मांग, गारूडी इ. जवळजवळ ५० आहेत. अनुसूचित जमाती भारतीय घटना अटी ३४३ अन्वयें पुढीलप्रमाणे भरडा, भिल्ल, धोंडीया, गोंड, कोळी, महादेव, ढोर, नायकडार, वडार, पारधी इ. सुमारे ३० ते ४० पेक्षा जास्त आहेत.

भारतीय राज्यघटनेमध्यें वरील अनुसुचित जाती-जमातीबाबत पुढील-प्रमाणे खुलासा केलेला आहे. या जाती जमातींना खास सवलती दिल्या जातात. आणि समाजातला एक दलित वर्ग म्हणून या जामातीकडे पाहिले जाते. सध्या मंडळ आयोगाने या जातीजमातीसाठी विशिष्ट राखीव जागा ठेवण्याची शिफारस केलेली आहे.

जमातीतील मागास म्हणून आज या जाती देखल्या गेल्या असल्या तरी त्यांना प्रगती पथावर आणून स्वातंत्र्याचे खरे श्रेय त्यांना देखील उपलब्ध करून द्यावे असा आपल्या सरकारचा मनोमन इरादा आहे. त्यांनाही हक्क कर्तव्यांची जाणिव करून दिली पाहिजे आणि पुढारलेल्या वर्गांनी त्यांच्याकडे सहानुभूतीने पाहिले गेले पाहिजे. आपल्या सरकारची घडण अशी आहे की, समाजात समानता नांदली पाहिजे. कोणत्याही एका वर्गाने दुसऱ्या वर्गाच्या हक्कांची पायमल्ली करू नये. म्हणून कायद्यानेच या वर्गाला मोठे संरक्षण करून दिलेले आहे. न्यायाचे पालन करण्याचे व्रत आपल्या सरकारने घेतले आहे असे आढळून आपणांस येत आहे.

[illegible] :

संविधानाच्या कलम ४० मध्यें स्थानिक स्वराज्य संस्थांचा पुरस्कार करण्याचे तत्व स्वीकारलेले असून यानुसार राज्यप्रशासन यंत्रणेने ग्रामपंचायती

स्थापन् कराव्यात व त्यांच्या कामाचे अधिकार व सत्ता त्यांचेकडे दिली जावी. यामार्गाने ग्रामीण जनतेचे सहकार्य, स्वयंप्रेरणा व मदत मिळावी. तसेच राज्याच्या वाढीव सामाजिक सेवांची जबाबदारी ही स्थानिक संस्थांवर टाकावी. यामुळे सहभागीत्वाची कल्पना, कार्यक्षमतेचे तत्व या दोन्ही गोष्टी ह्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून साध्य कराव्यात हा दृष्टिकोण ग्रामपंचायतींची स्थापना करण्यामागे असल्याचे आढळून येते.

वरील उद्दिष्टपूर्तीसाठी १९४९ मध्ये महाराष्ट्रात सर्वोदय योजना, मद्रासमध्यें फिरता विकास योजना अशा अनेकविध योजना ज्या त्या राज्यातून अंमलात आणल्या गेल्या. २ ऑक्टोबर, १९५२ मध्ये सामुदायिक विकास यो योजना व तिला पूरक १९५३ ची राष्ट्रीय सेवा विस्तार खंड योजना या म माध्यमातून ग्रामीण जनता स्वत: होवून पुढे येवून सामुहिक विचार व कार्य करण्याची सवय व्हावी. सामुदायिक जीवन उन्नत व्हावे हा त्यामागील दृष्टिकोण होता.

भारतातील बहुतांश जनता अशिक्षित आणि खेडयांत राहणारी आहे. त्यांचे शिक्षण आणि राजकीय व विकास कार्यातील सहभाग लोकशाहीच्या मार्गाने वाटचाल करण्यासाठी त्या जनतेचे शिक्षण लोकशाही शासनप्रणालीमधील सहभाग ही भारतीय लोकशाहीची महत्वपूर्ण गरज होती. याबाबत विल्यम ए रॉबसन यांच्या मते "लोकशाहीप्रधान राज्य यशस्वी करावयाचे असेल तर त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था भक्कम असाव्या लागतात."

प्रो. रिचर्ड पेस्टन यांच्या मते - "लहान लहान संस्था ह्या लोकशाहीच्या खऱ्या आधारस्तंभ आहेत. त्यांच्या अस्तित्वामूळेच लोकशाही अधिक प्रभावी व यशस्वी होते. इंग्लंड, भारत, जपान, अमेरिका या ठिकाणी राज्यकारभार उत्तम चालवण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची अत्यंत ग गरज भासते." भारताच्या संदर्भात ग्रामस्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थांचा लोकशाही तत्वानुसार विकास झाल्याशिवाय भारतातील लोकशाही स्थिर पायावर उभी राहू शकणार नाही. या कारणावरुन राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी ग्रामस्वराज्य या कल्पनेवर भर दिला जावा या बाबीचा पुरस्कार केला. स्थानिक स्तरावर कारभार तेथील प्रतिनिधींच्या संमतीने होत असेल तर त्याची चर्चा व्यापक, नागरिकांचे हक्क, कर्तव्ये या संबंधीत त्यातूनच स्थानिक जनतेचे सहभागीत्व व राजकीय शिक्षण विकसित होण्यास मदत होते.

सत्ता आणि जबाबदारी याचे विकेंद्रीकरण स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून होते. त्यामुळे केंद्र व राज्यप्रशासन यंत्रणेवरील कार्यभार कमी होतो. व्यक्तीस्वातंत्र्य हा लोकशाहीचा पाया होय. सत्ता केंद्रीकरण जेवढे जास्त तेवढे व्यक्तीस्वातंत्र्य कमी होते.

प्रा. आल्प् हक्सले म्हणतात की - राजकीयदृष्टया चांगला समाज निर्माण करण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण व जबाबदार स्थानिक प्रशासन निर्माण करणे गरजेचे असते.

शासन यंत्रणा आणि जनता यांच्यातील विचारप्रक्रिया, कृतीशीलतेचे आदानप्रदान करण्याचे एक साधन म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होत.

प्रो. लास्की यांनी सर्वसामान्य जनतेचे उच्च जीवनमान हा लोकशाहीचा अत्यंत आवश्यक आधार मानला आहे. भारतातील ग्रामीण जनतेचे दारिद्र्य, निरक्षरता आणि लोकशाही परंपरांचा अभाव यांचा एकत्र विचार केल्यास ग्रामीण जनतेचे जीवनमान वाढविण्याची, विकासकार्यात त्यांचा सक्रिय सहभाग निर्माण करण्याची आणि त्यांच्या व्यावसायिक शिक्षणाची आवश्यकता स्पष्ट होते. भारतातील ग्रामीण स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांचा विचार करीत असताना जनतेचे सहभागित्व, राजकीय शिक्षण, सत्तेचे विकेंद्रीकरण आणि आदानप्रदान या प्रक्रियेबरोबरच ग्रामीण जनतेच्या व्यावसायिक शिक्षणाची व्यवस्था किती प्रमाणात करण्यात आलेली आहे याचा शोध घेणे हेदेखील उद्बोधक ठरते.

......

# प्रकरण दुसरे

## संदर्भ


१) डॉ. द.गो. कापडनीस - पंचायत राज्य.

२) प्रा. डॉ. सुरेश काकडे व प्रा. अरविंद वहो - पंचायत राज्य

३) मुंबई ग्रामपंचायत कायदा, १९५८, कायदा नं. ३-१९५९ - महाराष्ट्र शासन.

४) मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९, महाराष्ट्र शासन.


.....